प्रेस नोट, दिनांक :- २८/०९/२०१७

## वारजे माळवाडी पो.स्टे. परिसरात दहशत पसरविणा-या अट्टल गुन्हेगारावर एम.पी.डी.ए. कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई

कोथरूड पो. स्टे. हद्दीत राहणारा गुन्हेगार इसम नामे सागर सुनिल गायकवाड, वय-२९ वर्षे, रा. गोसावी वस्ती, कर्वेनगर, पुणे हा अभिलेखावरील सराईत गुन्हे करणारा गुन्हेगार आहे. त्याने त्याचे साथीदारांसह वारजे माळवाडी व अलंकार पोलीस ठाणे परिसरात चाकू, कोयता, बांबु यासारखी जीवघेणी हत्यारे बाळगुन खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, दरोडा, जबरी चोरी, घातक शस्त्रे जवळ बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. त्याची गुन्हेगारी कृत्ये सन-२०१० पासून चालू आहेत. त्याचेविरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा ५६(१) (ब) प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात येवून सुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर काहीएक परिणाम होत नसलेचे दिसून आले होते. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परीसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

श्री. रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, गुन्हे, श्री. खांडेकर, वारजे माळवाडी पो.स्टे. यांनी एमपीडीए कायदयान्वये नमुद इसमास स्थानबध्द करण्याकामी प्रस्ताव तयार करुन मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी प्रस्तावाची पडताळणी करुन नमुद इसमाचे विरुध्द दिनांक २८/०९/२०१७ रोजी एमपीडीए कायदयान्वये एक वर्षाकरीता स्थानबध्दचे आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार त्यास कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर येथे स्थानबध्द करुन ठेवण्यात येत आहे.

गेले नऊ महिन्यात अशा गुन्हेगारी वृत्तीच्या १६ इसमांना एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द केले आहे.